झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स -II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोनिआ/४३६/२०२५
दिनांक : २८/०२/२०२५.

# झोपडपट्टी निर्मूलन आदेश

(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम १२ अन्वये)

<u>प्रस्तावना -</u>

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद स.नं.१००(पै), सि.स.नं.६६१३/३(पै), विठ्ठलनगर, पिंपरी वाघेरे, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ३३२६०.९८ चौ.मी. या महाराष्ट्र शासन, सरकारी गायरान मालकीच्या जागेवर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी मनपाने राबवलेल्या प्रकल्पा व्यतिरिक्त उर्वरित जागेवर अधिनियमाच्या कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करण्याबाबत दि.०३/१२/२०२१ रोजी आदेश पारित केले आहेत व सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील विकास नियंत्रण नियमावली, २०२२ यातील नियम क्र. १४.६.१२ (१) च्या तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता दि.२३/०१/२०२५ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

(३) सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करुन दि.०४/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण १५२६ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र १२३२ (मोफत पुनर्वसनाकरीता ४४६ व सशुल्क पुनर्वसनाकरीता ७८६), अपात्र २१४ व बिगर निवासी पात्र -१, अपात्र ४९, या प्रमाणे एकुण १२३३ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत;

(४) सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करणारा अंतिम आदेश दि.०३/१२/२०२१ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, डिसेंबर १६-२२, २०२१ पृष्ठ मध्ये क्र. ३४ व ३५ तसेच लोकमंथन व आज का आनंद या वृत्तपत्रात दि.१०/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे.

(५) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणा-या अंतिम आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड सह कलम १२ अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

(६) विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांनी सर्व झोपडीधारकांना तात्पुर्ती राहण्याची व्यवस्था हिंदुस्थान ॲटिबायोटिक्स ली. च्या स.नं.१०३, स.नं.१०४ आणि स.नं.१०६, पिंपरी वाघेरे, पुणे येथे संक्रमण शिबीराची व्यवस्था केलेली असून तसे दि.२७/०१/२०२५ रोजीचे नोटरीकृत हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे. योजना मुदतीत पूर्ण करुन संक्रमण व्यवस्था रिक्त करणेची जबाबदारी विकसकावर राहील.

(७) झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतूदींची पूर्तता करण्याच्या आधीन राहून योजनेअंतर्गत पुढील कामकाज पार पाडणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाल्याने व अधिनियमांतर्गत अशी कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३ ड सह कलम १२ (१) नुसार खालीलप्रमाणे झोपडपट्टी निर्मूलन आदेश पारित करत आहे.

आदेश :-

(१) खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

(२) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

(३) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी व संक्रमण व्यवस्थेसंदर्भातील अन्य निवासी व्यवस्थेचा विकल्प निवडून तात्काळ स्थलांतरित व्हावे.

(४) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

(५) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

(६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या

शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : स.नं.१००(पै), सि.स.नं.६६१३/३(पै), विठ्ठलनगर, पिंपरी वाघेरे, पुणे
महानगरपालिका क्षेत्र : पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| स.नं. / सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) पूर्णत: | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.१००(पै) सि.स.नं. ६६१३/३ (पै) | सरकारी गायरान (मनपाने राबवलेल्या योजना क्षेत्रा व्यतिरिक्त चे क्षेत्र) | ३३२६०.९८ चौ.मी. (मोजणी नकाशानुसार रस्त्याअंतर्गत क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र) | लागू मौजे भोसरीची शीव, नाला | सि.स.नं. ६५५१, ६५५२, ६६०९(पै), ६६१२, १२.० मी. डि.पी. रोड | स.नं.१००(पै), सि.स.नं. ६६१३/३(पै), १२.० मी. डि.पी.रोड | अण्णासाहेब मगर स्टेडियम, स.नं.१०० (पै), सि.स.नं. ६६१३/३(पै) |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :-२८/०२/२०२५.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे ३०/६/२००५

(नीलेश र.गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा)- यांसकडे माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
३. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी निर्मुलन आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.